# माहे मे 2021 मासिक अहवाल
# खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.

| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | माही | 1. पोना/1255 एस. एस सावंत<br><br>2. पोना/376 जे. के. जाधव | देवरुख पो.स्टे. गु.र.नं.76/2021, भादवि कलम 302, 201 हा गुन्हा दि.10.05.2021 रोजी 15:00 ते दि.11.05.2021 रोजी 09:00 वा. चे दरम्यान घडला असून सदर गुन्हयात श्वान पथकास बोलविल्यावरुन घटनास्थळी तपास कार्य सुरु केले. श्वान माही हिला रक्ताचे डाग असलेला काळा दगडाचा वास दिला असता श्वान माही ही घटनास्थळावरुन निघून घटनास्थळाचे पश्चिमेकडील दिशेने सुमारे 80 फुट अंतरावरील मोहन तुकाराम सावंत यांचे सामाईक घरात जाऊन घरात गोल गोल फिरुन घरातील पाठीमागील बाजूने पुन्हा घरासमोरील अंगणात येऊन अंगणात उभा असलेल्या इसमाचा वास घेऊन त्याच्याजवळ जाऊन भुंकू लागली. म्हणून सदर इसमाकडे तपास केला असता त्याने जमिनीच्या वादातून गुन्हा केला असल्याचे कबुल केलेले आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 2 | गोंदिया | राणा | 1. पोहवा./842 शुक्ला,<br>2. पोशि. / 1117 शेख | गोंदिया पो.स्टे. गु.र.नं. 316/2021, भा.दं.वि. कलम 457, 380 हा गुन्हा दि. 18/05/2021 रोजी 01.00 वा. ते 02.00 वा. चे दरम्यान घडला असून फिर्यादीचे घरामागील दरवाज्याजवळील प्लायवूड तोडुन अज्ञात चोरटयाने घरफोडी केली. घटनास्थळावर आढळून आलेल्या चप्पलचा वास श्वान नामे राणा यास दिला असता श्वानाने अंदाजे 100 ते 150 मि. अंतरावरील नामे हिवराज बावनकर यांचे घरासमोर व घरात भुंकून थांबला. त्यानंतर 6 संशयित आरोपींना पोलीस स्टेशन आवारात आणुन श्वानामार्फत ओळखपरेड घेतली असता पुन्हा चप्पलेचा वास श्वानास दिले असता संशयितांची उभे केलेली जागा बदलून सुध्दा संशयित आरोनी नामे धर्मराज दागो बावनवर याचेवरच भूंकून दाखवुन सदरचा गुन्हा श्वानाचे मार्गदर्शनावरून उघडकीस आला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 3 | यवतमाळ | कँडी | 1. पोउपनिरी / कार<br>2. पोना. /1462 सुनिल पजगाडे | अवधुतवाडी पो. स्टे. गु. र. नं 494 / 2021, भा. दं. वि. कलम 437, 438 हा गुन्हा दि. 17/05/2021 रोजी 01.00 वा. चे दरम्यान घडला असुन फिर्यादीची चार चाकी फोर्ड कंपनीची गाडी पेटवून नुकसान केले आहे. घटनास्थळावर श्वानाला पाचारण करण्यात आले होते. तेथे पिवळया रंगाची एक चप्पल पडलेली होती तिला तपासी अंमलदार यांनी लोखंडी टोपल्याखाली झाकून ठेवलेले होते. सदर चपलेचा वास श्वान कँडी हीस दिला असता श्वान कँडी ही गेट समोर उभे असलेले संशयित इसम नामे विजय सोंदले, रा. धनलक्ष्मीनगर, यवतमाळ यांचे अंगावर पाय ठेवुन भंुकून दाखविले. त्यावेळी तपासी अंमलदार यांनी त्याचेकडे विचारणा केली असता ती चप्पल त्याचीच असल्याचे त्याने कबूल केले. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 4 | सातारा | रिओ | 1. पोहवा./11 मोरे<br>2. पोहवा./724 सोनवणे | शिरवळ पो.स्टे. गु.र.नं.109/2021, भा.दं.वि. कलम 302, 201 हा गुन्हा घडला असुन घटनास्थळी मयत मुलाचे पश्चिमेस 20 ते 25 फुटावर एक निळया रंगांची प्लास्टिकचा दांडा असलेली कु-हाड मिळून आली. सदर कु-हाडीच्या दांडयाचा वास श्वान रिओ यास दिला असता कच्चा रोड ओलांडून पलीकडे मयताचे घराचे जवळ असणा-या पाण्याचे टाकीजवळून अंगणात उभे असलेल्या १२–१३ वर्षांचे मुलाजवळ श्वान जावून घुटमळू लागला. पुन्हा पुन्हा खात्री केली असता श्वान पहिल्या सारखीच कृती करीत होता. सदर मुलाकडे तपासी अधिकारी व स्था.गु.अ. शा. अंमलदार यांनी कसुन चौकशी केली असता सदरच्या मुलाने गुन्हा केल्याचे कबुल केले. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 5 | अकोला | लुसी | 1. पो□ा/१९२८ जी.एस. चव्हाण<br><br>2. पो.शि /2475 जी. आर. महाले | जुने शहर पो.स्टे. गु.र.नं.580/2021, कलम २०(b)(ii), NDPS Act 1985 हा गुन्हा दि.24.05.2021 रोजी 07:45 वा. चे दरम्याने घडला असून सदर गुन्हयात घरझडतीची कार्यवाही करणेकामी श्वान पथकास बोलविल्यावरुन घटनास्थळी तपास कार्य सुरु केले. श्वान लुसीला सदर घराचे उत्तरेकडील खोलीचे दरवाजाजवळून तपासकामी सोडले असता ती त्या खोलीतील कुलर, लोंखंडी पलंग जवळ वास घेत घेत लोखंडी पलंगाखालून तिला अंमली पदार्थाचा गंध आल्याने पलंगाखालील एका पिशवीला वारंवार वास घेऊन तोंड लावून इशारा दिल्याने सदर पिशवी उघडून पाहिली असता त्यामध्ये एका प्लॅस्टिक पिशवीमध्ये पाने फुले काडया बिया वगैरे असलेला ओलसर उग्रट वासाचा अंमली पदार्थ (गांजा) 640 ग्रॅम वजनाचा मिळून आला. |




**अशा प्रकारे माहे मे 2021 मध्ये खुन - 02, घरफोडी – 01, अकस्मात जळित - 01, अंमली पदार्थ - 01 असे एकुण 05 गुन्हे श्वान पथकामार्फत उघडकीस आलेले आहेत. .**